# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
# महाराष्ट्र, मुंबई

## दक्षता जनजागृती सप्ताह

दिनांक ६ नोव्हेंबर २००६ ते १० नोव्हेंबर २००६

| | | |
|---|---|---|
| १. | दूरध्वनी क्रमांक | २४९२ १२ १२, २४९२ २६ १८ |
| २. | टोल फ्री दूरध्वनी क्रमांक | १८०० २२ २०२१ |
| ३. | Website : | www.acbmaharashtra.org |
| ४. | Email ID : | acbwebmail@gmail.com |

## भ्रष्टाचार टाळा, देश मजबूत करा

भ्रष्टाचार निर्मूलनाचा विचार, करे लोकशाही साकार

लाच देऊ नका, लाच घेऊ नका

# PLEDGE

WE, THE PUBLIC SERVANTS OF INDIA, DO HEREBY SOLEMNLY PLEDGE THAT WE SHALL CONTINUOUSLY STRIVE TO BRING ABOUT INTEGRITY AND TRANSPARENCY IN ALL SPHERES OF OUR ACTIVITIES. WE ALSO PLEDGE THAT WE SHALL WORK UNSTINTINGLY FOR ERADICATION OF CORRUPTION IN ALL SPHERES OF LIFE. WE SHALL REMAIN VIGILANT AND WORK TOWARDS THE GROWTH AND REPUTATION OF OUR ORGANISATION. THROUGH OUR COLLECTIVE EFFORTS, WE SHALL BRING PRIDE TO OUR ORGANISATIONS AND PROVIDE VALUE BASED SERVICE TO OUR COUNTRYMEN. WE SHALL DO OUR DUTY CONSCIENTIOUSLY AND ACT WITHOUT FEAR OR FAVOUR.

# प्रतिज्ञा

आम्ही भारताचे लोकसेवक, याद्वारे गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की, आम्ही आमच्या सर्व कार्यक्षेत्रात सचोटी व पारदर्शकता आणण्याचा सातत्याने आटोकाट प्रयत्न करू. आम्ही अशीही प्रतिज्ञा करतो की, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी, आम्ही सर्वतोपरी कार्य करू. आम्ही दक्ष राहून आमच्या संघटनेच्या वृद्धीसाठी व लौकिकासाठी कार्य करू. आमच्या सामुदायिक प्रयत्नांनी आम्ही आमच्या संघटनांना अभिमान प्राप्त करून देऊ आणि आमच्या देशबांधवांना मूल्याधिष्ठित सेवा पुरवू. आम्ही आमचे कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडू आणि भय किंवा पक्षपात याविना कार्य करू.

सत्यमेव जयते

# मुख्यमंत्री

**महाराष्ट्र राज्य**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी २२०२ ५९५१, २२०२ ५२२ फॅक्स २२०२ ९२१४

दिनांक १२ ऑक्टोबर २००६

## शुभेच्छा

राज्यात ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २००६ या कालावधीत " दक्षता जनजागृती सप्ताह " आयोजित करण्यात येत आहे, ही आनंदाची बाब आहे.

भ्रष्टाचाराला आळा घालून कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. अनेक ठिकाणी आवश्यक असणारे परवाने व प्रमाणपत्रे मिळविण्याची पद्धती अधिक सोपी केली आहे. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात नागरी सुविधा केंद्रातून संगणकाच्या सहाय्याने सेवा सुरू केल्याने नागरिकांना आवश्यक ती कागदपत्रे, प्रमाणपत्रे वेळीच प्राप्त होत आहेत. यामुळे भ्रष्टाचाराला बऱ्यांच अंशी रोखता येईल असा मला विश्वास आहे.

लाच घेणे हा जसा गुन्हा आहे तसा लाच देणे हाही गुन्हा आहे. याबद्दल नागरिकांमध्ये जाणीव होणे गरजेचे आहे. म्हणूनच " मी भ्रष्टाचार करणार नाही किंवा भ्रष्टाचाराला उत्तेजनही देणार नाही " असा निश्चय प्रत्येकाने करावा आणि हा तो या सप्ताहापुरता मर्यादित न राहता कायमस्वरूपी अंगीकारावा असे मी यानिमित्त आवाहन करतो.

(विलासराव देशमुख)

सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री

**महाराष्ट्र राज्य**

दिनांक : ४ नोव्हेंबर,२००६

## शुभेच्छा

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र, मुंबई यांच्यावतीने दि. ६ ते १० नोव्हेंबर २००६ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद वाटला.

भ्रष्टाचार हा एक सामाजिक रोग असून त्यामुळे आपल्या देशातील अनेक जनकल्याणकारी योजनांना खीळ बसत आहे. राज्य शासन भ्रष्टाचाराला तसेच लाच देण्या-घेण्याला परिणामकारक आळा घालण्यासाठी प्रयत्न करीत आहे. तरी सुध्दा याबाबतीत जनतेने पुढे येऊन सहकार्य करण्याची गरज आहे. आज समाजात एकूणच नागरी जीवनाला वेग आला असल्यामुळे शासनाचे काम गतीमान पध्दतीने करण्यावर भर दिला जात आहे. त्याचाही परिणाम लाचलुचपतीला आळा घालण्यावर चांगल्या प्रकारे होत आहे. आपली कामे करुन घेण्यासाठी जनतेने लाच देऊ नये यादृष्टीने दक्षता जनजागृती सप्ताहामध्ये विभागातर्फे जनप्रबोधनाचे उपक्रम हाती घेतले जातील, असा मला विश्वास आहे.

विभागाने आयोजिलेल्या दक्षता जनजागृती सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

**( आर. आर. पाटील )**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र, मुंबई.

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : २२ ०२ २४ ०१ व २२ ०२ ५० १४, फॅक्स : २२ ०२ ४८ ७३

## दक्षता जनजागृती सप्ताह दिनांक ६ नोव्हेंबर २००६ ते १० नोव्हेंबर २००६

### लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांची कार्यपद्धती

**१. शासकीय कर्मचाऱ्यांकडे (Public Servant) असलेल्या अपसंपदा प्रकरणी :—**

अर्जदाराने नावानिशी अथवा निनावी केलेल्या अर्जावर योग्य माहिती दिलेली असल्यास त्याबाबत चौकशी केली जाते. उदा. एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने घरे, मोटारगाड्या, दुकाने, दागदागिने, शेतजमीन गैरमार्गाने मिळवलेली असेल अशा स्थावर मालमत्ता कोठे आहेत, मोटारगाड्यांचे नंबर इत्यादींबाबत उल्लेख असणे जरुरी आहे.

**२. सापळे**

तक्रारदाराने प्रत्यक्ष हजर राहून शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध लाचेच्या मागणीबाबत केलेल्या तक्रारीची पडताळणी होऊन सदर प्रकरणात सापळे आयोजित करून दोषी कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडून कारवाई केली जाते.

**३. पदाचा दुरुपयोग**

शासकीय कर्मचाऱ्याने (लोकसेवकाने) त्याच्या पदाचा दुरूपयोग करून शासकीय संपत्तीचा अपहार करणे किंवा स्वत:च्या फायद्यासाठी वापर करणे अथवा इतरांना तसा वापर करू देणे हेदेखील भ्रष्टाचाराच्या व्याख्येत मोडते. अशा प्रकरणामध्ये चौकशी होऊन तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास लाचलुचपत खात्याकडे गुन्हा नोंद होऊ शकतो.

१. लाच घेणे आणि देणेही गुन्हा आहे.
२. भ्रष्टाचार टाळा, देश मजबूत करा.
३. लाचेची नशा, करते जीवनाची दुर्दशा.
४. कायदेशीर व्यवहार, दूर ठेवी भ्रष्टाचार.

# भ्रष्टाचार निर्मूलन

## प्रस्तावना

सन २००१ पासून केंद्रीय दक्षता आयोगातर्फे देशपातळीवर भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यासाठी राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्याचा एक भाग म्हणून प्रत्येक वर्षी या देशाचे पोलादी पुरुष दिवंगत सरदार वल्लभभाई पटेल यांचे जन्मदिनाचे औचित्य साधून दिनांक ७ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर या काळात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येतो. ह्या उपक्रमात महाराष्ट्र शासनाचाही स्वयंप्रेरित सक्रिय सहभाग आहे.

या सप्ताहात भ्रष्टाचाराविरुद्ध जनमानसात प्रबोधन करणे, चर्चासत्र आयोजित करणे, शाळा कॉलेजात निबंध स्पर्धा घेणे, पदयात्रा काढणे, जनतेला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याची कार्यप्रणाली समजावून सांगणे, त्याविषयी पारदर्शक माहिती जनतेसमोर मांडणे प्रसारमाध्यमे विशेषतः वृत्तपत्रे व केबल व्यावसायिक यांचेही याकामी सहकार्य घेण्यात येत असून या सर्व माध्यमातून भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यास जनतेस तयार करणे, हा यामागील मूळ हेतू आहे.

देश भ्रष्टाचाराने पोखरला जात आहे. भ्रष्टाचाराचा हा राक्षस अधिकाअधिक उन्मत होत चालला असून त्याचा विनाश हा आपल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नानेच शक्य आहे. शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी म्हणजेच लोकसेवक व लोकप्रतिनिधी यापैकी कोणी लाच मागत असेल, भ्रष्टाचारी मार्गाने अपसंपदा जमा केली असेल किंवा करीत असेल तर त्याबाबतीत आपण लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार करू शकता किंवा माहिती पाठवू शकता. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक कार्यालय कार्यरत आहे.

भ्रष्टाचाराने देशाच्या आर्थिक विकासाचा कणा मोडतो व प्रगतीही खुंटते. देशाला व समाजाला लागलेली भ्रष्टाचाराची ही कीड वेळीच थांबवणे आवश्यक आहे. त्यामुळे या देशाची प्रगती, विकास व संपन्नतेसाठी आपण सर्वांनी भ्रष्टाचाराविरुद्ध या लढ्यात मनापासून सहभागी व्हावे, अशी आग्रही विनंती आहे.

भ्रष्टाचार म्हणजेच व्यक्तीने त्याच्या कायदेशीर हक्काव्यतिरिक्त केलेली मागणी. त्यामध्ये मागणी करणारा व ती पुरी करणारा मग ती प्रत्यक्ष रोख किंवा वस्तूच्या स्वरूपातसुद्धा यात तेवढीच जबाबदार असते.

मानवनिर्मित समाजरचनेमध्ये अनेक दोष आहेत. त्यामध्ये लाच, प्रलोभन, मागणी व त्यासाठी जोरजबरदस्ती यामधून निर्माण झालेली प्रवृत्ती म्हणजेच भ्रष्टाचार व तो समाजातील कोणत्याही स्तरावर वेगवेगळ्या स्वरूपात आढळतो.

# भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

समाजातील वाईट चालीरीती व प्रवृत्ती यांना आळा व पायबंद बसावा व दोषी व्यक्तींना दंड व शिक्षा व्हावी व याद्वारे समाजातील प्रत्येक स्तरावर घटकास कमीत कमी त्रास व्हावा या उदात्त हेतूने आपल्या देशामध्ये समाजरचनेस व धर्मरचनेस तसेच भौगोलिक स्थितीचा विचार करून वेगवेगळे कायदे अस्तित्वात आहेत. त्यापैकीच एक म्हणजेच "भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ हा आहे."

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमामध्ये काही महत्त्वाच्या तरतुदी :—

(१) कलम ७ अन्वये लोकसेवकाने त्यांच्या पदाच्या नात्याने आवश्यक असलेले काम पार पाडण्यासंबंधात कायदेशीर परिश्रमाखेरीज इतर पारीतोषणाची मागणी करणे.

(२) कलम ८ अन्वये लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने पारितोषण घेणे.

(३) कलम ९ अन्वये लोकसेवकावर वैयक्तीक प्रभाव पाडण्याकरिता प्रभाव पाडणे.

(४) कलम ११ अन्वये लोकसेवकाने केलेल्या कार्यवाहीशी किंवा व्यवहाराशी संबंधीत असलेल्या व्यक्तींकडून अशा लोकसेवकाने कोणताही मोबदला न देता मुल्यवान वस्तू प्राप्त करणे.

(५) कलम १२ अन्वये कलम ७ किंवा ११ मध्ये व्याख्या केलेल्या अपराधांना प्रोत्साहन देणे.

(६) कलम १३ लोकसेवकाचे गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन.

| | | |
|---|---|---|
| (अ) कलम १३ (१) (ओ) | : | नेहमीच्या सवयीने लाच स्वीकारणे. |
| (ब) कलम १३ (१) (बी) | : | ७ नेहमीच्या सवयीने वस्तू स्वीकारणे. |
| (क) कलम १३ (१) (सी) | : | लोकसेवकाकडे सोपविण्यात आलेल्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या मालमत्तेचे अफरातफर करणे. |
| (ड) कलम १३ (१) (डी) | : | लोकसेवकाने पदाचा गैरवापर करून लाच स्वीकारणे. |
| (इ) कलम १३ (१) (ई) | : | लोकसेवक समाधान कारक उत्तर देऊ शकणार नाही असा आर्थिक साधन संपत्तीच्या किंवा माहित असलेल्या त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत एवढी मालमत्ता जमा करणे. |

(ई) कलम १३ (२) : अन्वये गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन करीत असा कोणताही लोकसेवक, सहा महिन्यापेक्षा कमी असणार नाही परंतु, ज्यात सात वर्षापर्यंत वाढ करता येईल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस तसेच द्रव्यदंडासही पात्र ठरेल.

**लाच मागितल्याची तक्रार कुठे व कशी करता येईल ?**

(१) आपल्याकडे कोणी शासकीय नोकराने, लोकप्रतिनिधीने लाच मागितली तर त्याचे विरुद्ध लाच देण्यापूर्वी आपण ॲन्टी करप्शन ब्युरोच्या संबधित कार्यालयात तक्रार करावी. ही तक्रार लेखी स्वरूपात घेतली जाते. अशा तक्रारी केवळ दूरध्वनीवरून कळवून किंवा अर्जाने न करता समक्ष करावी.

(२) अपसंपदेबाबत तक्रार :— कोणी शासकीय नोकर, लोकप्रतिनिधी याने त्याचे कायदेशीर मार्गाने मिळालेल्या उत्पन्नापेक्षा अधिक स्थावर व जंगम मालमत्ता तयार केल्याची माहिती आपल्याकडे असेल तर त्याबाबतचे वस्तुनिष्ठ माहितीची लेखी नावे अगर निनावी तक्रार ही आपण करू शकता.

एखाद्या लोकसेवकाने बेहिशोबी मालमत्ता (संपत्ती) जमविल्या असल्याच्या तक्रारी असतील तर मुंबई व पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडील आदेशाने स्थानिक शाखेचे अधिकारी त्याबाबत चौकशी करू शकतात. परंतु, अशा प्रकारची माहिती देताना नागरिकांनी मोघम व अतिरंजित अशी माहिती न देता ठोस स्वरूपाची व निश्चित अशी माहिती द्यावी. विशेषत: अशा लोकसेवकाचे शेतजमीन किंवा घर अशी स्थावर मालमत्ता ज्या गावात किंवा शहरातील भागात, वस्तीत आहे त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वाहनाचे बाबतीत वाहनाचे क्रमांक, बँकठेवी व खात्यांच्या बाबतीत बँकेचे व शाखेचे नाव अशा प्रकारची माहिती द्यावी. अशी मालमत्ता जर संबंधित लोकसेवकाचे इतर नातेवाईकांचे नावे असेल तर त्या मालमत्तेशी त्या लोकसेवकाचा कसा संबंध आहे याची माहिती द्यावी. याप्रकरणी माहिती देणाराचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवले जाते. (लोकप्रतिनिधी पदावर नसेल तरीसुद्धा ज्या वर्षी तो पदावर येतो त्यावेळी जमवलेल्या संपत्तीबाबत चौकशी होऊ शकते. तक्रार करणाऱ्याने प्रामाणिकपणे पुराव्यासह नावाने अथवा निनावी तक्रार करावी.)

(३) चौकशी/गुप्त – उघड :—या प्रकारामध्ये नावानिशी किंवा निनावी अर्जावरदेखील चौकशी केली जाते. उदा. एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याने घरे, मोटारगाड्या, दुकाने, दागदागिने, शेतजमीन, गैरमार्गाने मिळविली आहे. स्थावर मालमत्ता कोठे आहे यांचा उल्लेख असणे जरुरीचे आहे.

गुप्त चौकशी यासाठी आवश्यक असते की, काही खोडसाळ तक्रारी होतात. अशावेळी त्या लोकसेवकाचे दैनंदिन कर्तव्यात कोणताही मानसिक दबाव तयार होऊ नये किंवा त्याने खरोखरीच भ्रष्टाचार केला असेल तर, त्याने त्या मालमत्तेची अगर पैशाची विल्हेवाट लावण्यापूर्वीच चौकशीत माहिती गोळा करून तत्काळ कारवाई करणे.

(४) पदाचा दुरूपयोग :—एखाद्या व्यवहारात शासकीय नोकर/लोकसेवक/लोकप्रतिनिधी/ विश्वस्त यांनी शासनाचा पैसा गैरमार्गाने खर्ची घातला अगर बनावट व्यवहार करून शासकीय पैसा स्वत:चे स्वार्थासाठी काढून घेतला तर, त्याबाबतही तक्रार करू शकता.

शासकीय कर्मचाऱ्याने (लोकसेवकाने) त्याच्या पदाचा दुरूपयोग करून शासकीय संपत्तीचा अपहार करणे किंवा स्वत:च्या फायद्यासाठी वापर करणे अथवा इतरांना तसा वापर करू देणे अशा प्रकरणांमध्ये संबंधित खात्यामार्फत चौकशी करण्यात येते. चौकशीमध्ये भ्रष्टाचार आढळून आल्यास संबंधित खात्याचे प्रभारी अधिकारी गृहख्यात्यामार्फत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे त्या तक्रारी पाठवितात. त्याचप्रमाणे अशा प्रकरणांमध्ये प्रथमदर्शी ठोस पुरावा उपलब्ध असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फतदेखील चौकशी केली जाते.

**ॲन्टी करप्शनकडे तक्रार केल्याचे फायदे**

(१) काम लवकर होते किंवा जर अपूर्ण अवस्थेतील काम असेल तर ॲन्टी करप्शनचे अधिकारी काम पूर्ण करून घेण्यासाठी पाठपुरावा करतात.

(२) वारंवार कोर्टात हेलपाटा घालावा लागत नाही.

(३) स्वत:चा वकील नेमावा लागत नाही.

(४) काही दिवसानंतर लाचेची रक्कम परत मिळते.

(५) संपूर्ण गुप्तता पाळली जाते.

(६) तक्रार करणाऱ्याचे नाव प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्ध केले जात नाही.

(७) योग्य सल्ला व मार्गदर्शन मिळते.

(८) भविष्यात आरोपी निर्दोष सुटला तरी तक्रार करणाऱ्याला नुकसान भरपाई द्यावी लागत नाही.

**लाच घेण्याचे गंभीर परिणाम**

(१) लाच घेणे हा गुन्हा आहे. त्यामुळे गुन्हा दाखल होतो व निलंबनाची कारवाई होते.

(२) समाजात नाचक्की होते व जनमत वाईट होते.

(३) आपली सामाजिक प्रतिमा डागाळते.

(४) कुटुंबावर आर्थिक अरिष्ट येते.

(५) तो दररोज जिवंत असून मेल्यासारखाच असतो.

(६) मुलांना नोकरी मिळणे अवघड होते.

(७) लग्न जमणे कठीण जाते.

(८) निकाल लागेपर्यंत मनस्ताप होतो. आजारपण आले तर हजारो रुपये खर्च होतात.

(९) दोषी ठरल्यास ग्रॅच्युएटी व पेन्शन मिळत नाही.

(१०) कितीही मोठा वशिला असला तरी काहीही उपयोग होत नाही.

**भ्रष्टाचार रोखण्यासाठी आपण काय करू शकतो ?**

(अ) जनता अगर समाज काय करू शकतो ?

- भ्रष्टाचाराविरुद्ध मनाने तयार व्हावे लागेल.
- भ्रष्ट लोकांविरुद्ध तक्रारी करणे. (नावी/निनावी)
- भ्रष्टाचाराविरुद्ध जनमत/प्रबोधन करणे.
- लोकांची मनातील भीती घालवणे.
- कारभार पारदर्शी ठेवण्याचा आग्रह धरणे.
- लाच देणे व घेणे गुन्हा आहे हे समजावणे, जाणीव करून देऊन परिणाम ही सांगावेत.
- लाचलुचपत प्रतिबंधक खात्याची तसेच अन्य कार्यालयांची कार्यप्रणाली समजून घेऊन त्याचा आधार घेणे.
- आपणही भ्रष्टाचाराला खतपाणी न घालणे.
- भ्रष्टाचारामुळे देशाची प्रगती खुंटते, काळा पैसा वाढतो, पैशाची उघड्या व्यवहारातील गती कमी होते. देशापुढील आरिष्ट्ये व संकटे वाढतात.
- कायद्याच्या उल्लंघनाची प्रवृत्ती टाळावी.

(ब) लोकसेवक व लोकप्रतिनिधी काय करू शकतात ?

- आपण आपला कारभार पारदर्शी ठेवणे आवश्यक आहे.
- आर्थिक प्रगतीचा ध्यास असावा परंतु, यात हव्यासी वृत्ती, अवैध मार्गाने अर्थारजन नको हे जाणले पाहिजे.
- आपण आपला मासिक पगार घेताना जनतेतील प्रत्येक व्यक्तीचे घामातून त्यातील प्रत्येक रुपया व नया पैसा तयार झाला आहे. याची जाणीव ठेवून किमान काहीसा तरी जनसेवेचा दृष्टिकोन असावा.

- आपणास जी खुर्ची शासनाने दिली ती समाजसेवेसाठी उपयोगात आणू शकतो. या समाजाचे आपण देणेकरी व ऋणी आहोत हे सामाजिक उत्तरदायीत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे. नोकरी ही पगार देऊन जनसेवेची मिळालेली संधी आहे.

**लोकसेवक व लोकप्रतिनिधी म्हणजे काय ?**

सर्व शासकीय नोकर, निम-शासकीय सेवांतील नोकरदार, शासकीय कंपन्यांतील नोकरवर्ग, लोकप्रतिनिधी यात मंत्री, आमदार, खासदार, नगरसेवक, सर्व महामंडळे, वीज मंडळ, जिल्हाध्यक्ष-जिल्हापरिषद, नगराध्यक्ष, नगरपरिषद, ग्रामपंचायत-सरपंच, पोलीस पाटील व शासनाकडून पगार, मानधन घेणारे हे लोकसेवक व लोकप्रतिनिधी ठरतात व त्यांचेविरुद्ध आपण अे.सी.बी. कडे तक्रार करू शकता. यात लोकसेवकांवर प्रभाव पाडून कामे करून देणारे व अशा गुन्ह्यात मदत करणारे हे लोकसेवक नसले तरी त्यांचे विरुद्धही तक्रारी घेतल्या जातात. शासकीय मदत तथा अनुदानित शाळांतील शासनाकडून पगार घेणारे अधिकारी, कर्मचारी हेही लोकसेवकाचे व्याख्येत येतात.

**भ्रष्टाचाराचे बाबतीत तक्रार कोणाकडे करू शकता ?**

(१) संबंधित खात्याचे प्रमुख व त्या त्या खात्याच्या दक्षता पथकाकडे.

(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई कार्यालय.

(३) सी.बी.आय.—— केंद्र शासनाचे अखत्यारीतील शासकीय नोकरदार यांचेविरूद्ध तक्रार सी.बी.आय.कडे केली जाते.

(४) लोकआयुक्त.

(५) भ्रष्टाचाराविरुद्ध लढणाऱ्या संघटना व संस्था यांचेकडे जाऊन त्यांची मदत घेता येईल.

**"Money is some thing and not everything"**

संकटसमयी कोणी कोणाचे नसते, भ्रष्टाचाराने व पापाने मिळविलेल्या पैशाचा उपभोग कुटुंबातील सर्व नातेवाईक घेतात. परंतु, पापाचे वाटेकरी होण्यास कोणी तयार नसतात. याचा साक्षात्कार झाला म्हणूनतर वाल्याचा वाल्मिकी झाला. आता आपण केलेली पापे गंगार्पण करा व वाल्मिकी होण्याचा निश्चय करा यातच आपले भले आहे.

पैसा, पद, संपत्ती, बंगला, गाडी यामुळे आपण सुखी होत नाही. लोभ वाढतच असतो. मृत्यूनंतर सर्व येथेच सोडून जावे लागते. बरोबर काहीही येत नाही. पत्नी दारापर्यंत, मुलं-मित्र-नातेवाईक स्मशानापर्यंत, चितेवर फक्त आपला देहच असतो.

**"On this earth there is enough for everyone's need but not for their greed."—Mahatma Gandhi**




ट्रॅप, रंगेहाथ